विशेष पोलीस महानिरीक्षक,मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य,पुणे

यांचे कार्यालय

बीडीगेट, औंध,पुणे-४११०६७ दूरध्वनी क्र. ०२०-२५८८०९१४

E-mail Id: - dyspcsp@gmail.com


जा.क्र.:- शाखा 1-अ/वाहन अपघात तांत्रिक अभिप्राय परिपत्रक/ ८५३/ 2025 पुणे दिनांक 7/04/2025

विषय :- पोलीस वाहनांच्या अपघाताबाबत तांत्रिक अभिप्राय मिळणेकामी सादर करावयाच्या प्रकरणाबाबत

---000---

**परिपत्रक -**

उपरोक्त विषयास अनुसरुन आमचे असे निर्देशनास आलेले आहे की, राज्यातील पोलीस मोटार परिवहन विभागाकडून त्यांचे घटकांकडील पोलीस वाहनांना झालेल्या अपघाताबाबत ते तांत्रिक अभिप्राय मिळणेबाबतची प्रकरणे या कार्यालयास सादर केली जातात.

तसेच काही अपघात प्रकरणात उप विभागीय पोलीस अधिकारी निव्वळ मोटार अपघात अ समरी मंजूर करुन पोलीस ठाणे अभिलेखावर तशी नोंद घेऊन प्रकरण दप्तरी दाखल करण्याचे आदेश देतात.तरी सुध्दा अपघाताची प्रकरणे या कार्यालयास प्राप्त होत असतात.

पोलीस नियमावली पुस्तीका भाग-3-नियम क्रमांक 472 मध्ये अपघाताच्या बाबतीत आवश्यक असलेली कारवाई पोलीस अधीक्षक/समादेशक यांनी केली पाहीजे. जरूर तर मदतीचा सल्लाही पोलीस उप महानिरीक्षक (मोटार परिवहन) यांचेकडून प्राप्त केला पाहीजे. असे नमूद आहे.

पोलीस घटकांतील वाहनांच्या अपघाताबाबत संबधित घटक प्रमुखांनी पोलीस नियमावली पुस्तीका भाग-3-नियम क्रमांक 472 मध्ये नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. जरूर असल्यासच या कार्यालयाचा सल्ला घेण्याकरीता स्पष्टीकरणासह अपघात प्रकरणे या कार्यालयास पाठविण्यात यावी.

(अशोक मोराळे)

विशेष पोलीस महानिरीक्षक

मोटार परिवहन, महाराष्ट्र राज्य पुणे

प्रति,

सर्व पोलीस घटक प्रमुख

सर्व पोलीस मो.प. प्रभारी अधिकारी

पोलीस अधीक्षक परिक्षेत्र पुणे नागपूर, छ. संभाजीनगर व कोकण परिक्षेत्र नवी मुंबई

पोलीस उप अधीक्षक मो.प.द.प.पुणे व मो.प.पु.प. नागपूर